# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
## प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला

### जाहिरात सूचना

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला अंतर्गत काजू विभागामधील प्लॉट क्र. 6 मधिल 165 नग तर सिडफार्म ए, बी, व सी मधिल 128 जुनी काजू झाडे अशी एकूण 293 लागवड केलेली संकरीत काजू झाडे मुळासकट तोडून जाहीर तोंडी लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहेत.

तरी जाहिर तोंडी लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या इच्छुक व्यक्तिंनी दिनांक 22/03/2022 रोजी सकाळी 10.00 वाजता काजू प्रक्षेत्र, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे उपस्थित रहावे.

विक्री करण्यात येणारी काजू झाडे दिनांक 07/03/2022 ते दिनांक 21/03/2022 या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेमध्ये पहावयास मिळतील. तसेच विक्री संदर्भातील अटी व शर्ती विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) पहावयास मिळतील.

ठिकाण : प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला (काजू विभाग)

# जाहिर लिलाव प्रक्रियेबाबतच्या अटी व शर्ती

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला अंतर्गत काजू विभागामधील मुळासकट तोडावयाच्या 293 काजू झाडांच्या विक्री बाबत...

1. सदर 293 नग काजू झाडे शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेमध्ये मुळासकट तोडावयाची आहेत.
2. ज्या ठेकेदाराची अंतिम बोली रक्कम विद्यापीठामार्फत मंजूर ठरेल, अशा ठेकेदाराने बोली रक्कम + एकूण बोली रक्कमेच्या 5 टक्के अनामत रक्कम या कार्यालयास पुर्ण जमा केल्यानंतरच झाडे तोडण्याची परवानगी अदा करण्यात येईल.
3. विद्यापीठामार्फत योग्य ठेकेदाराची निवड झाल्याचे संबंधीत ठेकेदारास कळविल्याच्या दिनांकापासून पुढील 10 दिवसांपर्यंत सदर ठेकेदाराने मंजूर बोली रक्कम + एकूण बोली रक्कमेच्या 5 टक्के अनामत रक्कम ही या कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपला ठेका रद्द करुन दुसऱ्या क्रमांकाच्या बोली धारकास ठेका देण्यात येईल.
4. झाडे तोडण्याबाबतचे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून 30 दिवसांत झाडे बुंध्यासहीत तोडून कार्यालयीन वेळेमध्ये वाहतूक करावयाची आहेत.
5. झाडे तोडून वाहतूक करताना वाहतूकीबाबतची परवानगी आपणांस संबंधीत खात्याकडून घेणे बंधनकारक राहील.
6. झाडे तोडताना अगर वाहतुकी दरम्यान शासकीय जंगम अथवा स्थावर मालमत्तेचे नुकसान झाल्यास भरपाई म्हणून जमा केलेली 5 टक्के अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
7. बोली दर स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार समिती अध्यक्ष यांना राहतील.
8. अपेक्षित बोली दर प्राप्त न झाल्यास संपूर्ण बोली प्रक्रिया रद्द करण्यात येईल.
9. झाडे तोडण्याकरीता आवश्यक ती अवजारे व साहित्य तसेच मनुष्यबळ ठेकेदाराने आणावयाचे आहे. या केंद्रामार्फत कोणत्याही प्रकारचे अवजार, साहित्य तसेच मनुष्यबळाचा पुरवठा केला जाणार नाही.

10. झाडे तोडताना संबंधित ठेकेदाराने कामाचे ठिकाणी स्वतः उपस्थित रहाणे बंधनकारक राहील.

11. तोडलेली झाडे वाहतुक करताना दैनंदिन शासकीय कामात अडथळा निर्माण होणार नाही यांची पूर्ण खबरदारी ठेकेदाराने घेणे आवश्यक आहे.

12. झाडे तोडणी दरम्यान ठेकेदार अथवा उपस्थित मजूरांकडून प्रक्षेत्रावर कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही याची कटाक्षाने खबरदारी घेणे बंधनकारक राहिल.

13. झाडे तोडणीपूर्वी काजू विभागातील संबंधित अधिकारी अथवा कर्मचारी यांना पूर्व कल्पना देणे आवश्यक राहील.

14. झाडे तोडणीनंतर तोडलेल्या झाडांच्या फांदया अथवा ठेकेदारास अनावश्यक वाटणाऱ्या झाडाच्या हिस्सापैकी कोणताही कचरा प्रक्षेत्रावर शिल्लक रहाणार नाहीत यांची खबरदारी ठेकेदाराने घ्यावी.

15. बोली दर स्विकारल्यानंतर सदर ठेकेदारास रु. 100/- च्या बॉड पेपर वर सर्व अटी/शर्ती मंजूर असल्याबाबतचे करारपत्र करावे लागेल.

16. जाहीर लिलाव सुरू होण्यापूर्वी प्रत्येक बोली दारांने रक्कम रू. 1,000/- (रू. एक हजार) मात्र अनामत रक्कम म्हणून या कार्यालयास भरणा करावी. जे बोलीदार अनामत रक्कम भरणा करणार नाहीत त्यांना जाहीर लिलावात बोली करण्याचा हक्क राहणार नाही. जाहीर लिलाव प्रक्रिया संपल्यानंतर भरलेली अनामत रक्कम बोली दारास परत केली जाईल.

**X X X**